RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ५६(२)] सोमवार, ऑगस्ट ४, २०२५/श्रावण १३, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ८०

प्राधिकृत प्रकाशन

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

[महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१-बी) अंतर्गत]

सूचना

क्रमांक झोपुप्रा/उसंनर/फेरबदल/साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे/किरोळ/न.भू.क्र. १६९(भाग), १७० (भाग)/२०२५/१९१

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने त्यांच्या दि.०८/०५/२०१८ ची अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/सीआर/प्रक्र-११८/२०१७/वि.यो./नवि-११, अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या सुधारित विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" या प्रमाणे करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) अन्वये मंजुरी दिलेली असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राची सुधारित विकास योजना-२०३४, दि. ०१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/सीआर-११८(III)/२०१७/नवि-११, दि.१२/११/२०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर झालेली असून ती दि.१३/११/२०१८ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने १६ डिसेंबर १९९५ च्या अधिसूचना क्रमांक झोपुयो १०९५/प्र.क्र-३७/गृहनिर्माण सेल, अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम,, १९७१ मधील कलम ३(अ) मधील तरतुदीच्या अधिन राहून "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची" नियुक्ती केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम २(१९)(बी) नुसार उक्त प्राधिकरणास बृहन्मुंबई क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता सदर अधिनियमात अभिप्रेत असणारा नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिलेला असून त्यानुसार उक्त अधिनियमातील कलम ३७(१-बी) अन्वये मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करण्यासंबधीचा प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्याचा उक्त प्राधिकरणास अधिकार प्राप्त झाला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाचा ठराव क्र.५/६/४, दि. २८ ऑगस्ट १९९७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१-बी) खालील तरतुदीनुसार जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत / झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रांतर्गत/ घोषित झोपडपट्टी क्षेत्रात / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१-बी) व इतर योग्य त्या कलमाखाली मुंबई विकास आराखड्यात आवश्यकतेनुसार फेरबदल, सुधारणा इत्यादी करण्याचे प्रस्ताव मांडण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्राधिकरणाच्या दि. ७/६/२००४ रोजीच्या बैठकीत बाब टिप्पणी क्र. १२.६ अन्वये प्रदान करण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, "एन" विभाग मौजे किरोळ, ता. कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर येथील न.भू.क्र. १६८, १६८/१ ते १०, १६९, १६९/१ ते १३४, १७०, १७०/१ ते १५, १७१/२ ते १६, १७१क, १७२, १७२/६५ ते ८९ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन" या प्रमाणे करण्यात आला आहे) ही झोपडपट्टी वसाहत असून ती "चिराग नगर" या नावाने ओळखली जाते (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" या प्रमाणे करण्यात आला आहे) व सदर मिळकतीवर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम,, १९७१ मधील कलम ३(क) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र (Slum Rehabilitation Area)" घोषित करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचे भागशः क्षेत्र उक्त विकास योजनेमध्ये १३.४० मी. प्रस्तावित विकास योजना रस्त्याने बाधित होत आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त रस्ता" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्याचे स्थान असून राज्य शासनाने उक्त क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रकल्प" या प्रमाणे करण्यात आला आहे) बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि. १८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णय अन्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक समिती स्थापन केलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त समिती" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि. ११/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णय उक्त प्रकल्प हा "सार्वजनिक निकडीचा प्रकल्प (Vital Project)" म्हणून घोषित केला आहे आणि उक्त प्रकल्पाची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून उक्त प्राधिकरणाची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समितीने उक्त प्रकल्पाचे वास्तुविशारद म्हणून श्री. योगेश धायगुडे यांची नियुक्ती केलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त वास्तुविशारद" या प्रमाणे करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर विचार केल्यानंतर उक्त प्रकल्पाच्या अंमलबजावणी होणेच्या दृष्टीने उक्त जमिनीवरील उक्त रस्ता वगळून सदर क्षेत्र रहिवास (R) विभागात समाविष्ट करणे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे) या फेरबदलाकरिता उक्त अधिनियमातील कलम ३७ (१बी) प्रमाणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे उक्त प्राधिकरणाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमातील कलम ३७ मधील उप-कलम (१बी) अनुसार उक्त प्राधिकरण खालील अनुसूचीमध्ये विश्लेषित केल्यानुसारच्या प्रस्तावित फेरबदला संदर्भात आम नागरिकांकडून सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याची सूचना प्रसिद्ध करीत आहे. सदरची सूचना शासन **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १ (एक) महिन्यात सूचना आणि/किंवा हरकती मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेकडे दाखल करण्यात याव्यात. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना आणि/किंवा हरकती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून विचारात घेण्यात येतील.

अनुसूची

"एन" विभाग येथील मौजे- किरोळ, ता- कुर्ला, जिल्हा – मुंबई उपनगर, येथील न.भू.क्र. १६९ (भाग) आणि १७० (भाग) या जमिनीवरील १३.४० मीटर प्रस्तावित विकास योजना रस्ता वगळून भाग नकाशावर दर्शविलेले सदर क्षेत्र रहिवास (R) विभागात समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरिता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) मुख्य अभियंता, विकास योजना, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ५वा माळा, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) उप संचालक, नगररचना, पहिला मजला, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

(३) उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई, एन्साहटमेंट्स, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(४) सहायक आयुक्त, "एन" विभाग कार्यालय , १०१-३ जवाहर रोड, साईबाबा नगर, पंत नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र ४०० ०७७.

३. सदरची सूचना ही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या *www.sra.gov.in* वेबसाईटवर उपलब्ध राहील.

वांद्रे (पूर्व), मुंबई,
दिनांक १ ऑगस्ट २०२५.

डॉ. महेंद्र कल्याणकर,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

SLUM REHABILITATION AUTHORITY, BRIHANMUMBAI

[Under section 37(*1-B*) of the Maharashtra Regional and Town planning Act, 1966]

Notice

No. SRA/DDTP/Modification/ Sahityaratna Lokshahir Annabhau Sathe/Kirol/CTS No. 169 (Pt), 170 (Pt)/2025/191

Whereas, the Revised Development Plan 2034 of Greater Mumbai Municipal Corporation Area (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the State Government in the Urban Development Department, partly under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, dated 08/5/2018 and the said Development Plan came into force from 01/09/2018 ;

And whereas, the revised Development Control and Promotional Regulations for Greater Mumbai Municipal Corporation Area have been sanctioned by the State Government *vide* Urban Development Department's Corrigendum Notification No.TPB-4317/629/CR-118(III)/2017/UD-11, dated 12/11/2018 (hereinafter referred to as "the said DCPR") and the said DCPR came into force with effect from 13/11/2018 ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification of Housing and Special Assistance Department No. SRD 1095/CR-37/Housing Cell, dated- 16th December 1995 has appointed "Mumbai Slum Rehabilitation Authority" under the provisions of Section 3(*A*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 for its jurisdiction (hereinafter referred to as "the said Authority") ;

And whereas, according to the provisions of Section No-2(*19*) (*b*) of the said Act the said Authority has been declared as the Planning Authority for the purpose of implementation of Slum Rehabilitation Scheme in its jurisdiction and according to the provisions of Section No- 37 (*1-B*) of the said Act, the said Authority has been empowered for initiating modification in the said Development Plan and submit it to Government ;

And whereas, the Chief Executive Officer of the said Authority has been empowered to initiate modification to the said Development Plan under the provisions of sub-section (*1-B*) of Section 37 of the said Act and call upon suggestions/objections from public by the resolution No. 5/6/4, dated 28th August, 1997 of the said Authority ;

And whereas, the Chief Executive Officer of the said Authority has been empowered and authorized to make modification or correction etc. in the sanctioned Development Plans in the areas of Slum Rehabilitation Scheme/Slum Rehabilitation Area/Notified Slum Area under their jurisdiction as stipulated in Section 37(*1-B*) of the said act and to submit proposal to the State Government for sanction under the provision of Section 37 of the said Act, *vide* their Resolution No.12.6, dated 7th June 2004 ;

And whereas, the lands bearing CTS No. 168, 168/1 to 10, 169, 169/1 to 134, 170 ,170/1 to 15, 171/2 to 16, 171C, 172, 172/65 to 89 of Village Kirol, Taluka Kurla, District Mumbai Suburban, Ward "N" (hereinafter referred to as "the said land") are Slum Areas and this Slum is popularly known as "Chirag Nagar" (hereinafter referred to as "the said Area") and the said land is declared as "Slum Rehabilitation Area" under section 3(*C*) of Maharashtra Slum Areas (Improvement,. Clearance and Redevelopment) Act, 1971.

And whereas, in the said Development Plan the said land is partly reserved for 13.40 mt. wide DP Road" (hereinafter referred to as "the said Road") ;

And whereas, the said Area contains Sahityaratna Annabhau Sathe's place of residence and the State Government has decided to build a Sahityaratna Lokshahir Annabhau Sathe Research and Training Institute (hereinafter referred to as "the said Project") of international standard on the said Area.

And whereas, the State Government's Social Justice and Special Assistance Department *vide* Government Resolution dated 18/09/2017 has formulated a Sahityaratna Lokshahir Annabhau Sathe Memorial Committee (hereinafter referred to as "the said Committee") ;

And whereas, the State Government's Social Justice and Special Assistance Department wide Government Resolution dated 11/03/2024 has declared the said project as "Vital Project" and has appoint the said Authority as Implementation Authority for the said Project ;

And whereas, the said Committee has appointed Shri Yogesh Dhaigude as the architect for this project (hereinafter referred to as "the said Architect") ;

And whereas, after considering the proposal submitted by the said Architect, the said Authority is of the opinion that for implementation of the said Project it is necessary to initiate the procedure under section 37(*1B*) of the said Act to delete and include the land under the said road on the said land in "Residential (R) Zone" (hereinafter referred to as "the said Modification").

Now therefore, in accordance with the provisions contained in sub-section (*1B*) of Section 37 of the said Act, the said Authority hereby publishes this notice for inviting suggestions and/or objections in respect of the proposed modification described in the schedule herein below, from the general public within 1 (one) month from the date of publication of the notice in the *Maharashtra Government Gazette*. The suggestion and/or objections shall be addressed to the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Third Floor, Administrative Building, Prof. Anant Kanekar Marg, Bandra (E), Mumbai 400 051. The suggestions and/or objections received within the aforesaid stipulated period shall only be considered by the said Authority.

Schedule

"The 13.40 mtr. proposed DP Road on the lands bearing CTS No. 169 (pt) and 170 (pt) of Village Kirol, Taluka Kurla, District Mumbai Suburban, Ward "N", which is under proposal of Sahityaratna Lokshahir Annabhau Sathe Research and Training Institute is proposed to be deleted and the area therein is to be included in Residential (R) Zone as shown on part plan".

2. A copy of the part plan showing proposed modification shall be kept open for inspection by the general public in the following offices for the period of one month :—

(1) Chief Engineer, Development Plan, Municipal Corporation of Greater Mumbai, 5th Floor, Extn. Building, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) The Deputy Director of Town Planning, Slum Rehabilitation Authority, First Floor, Administrative Building, Prof. Anant Kanekar Marg, Bandra (E.), Mumbai 400 051.

(3) The Dy. Director of Town Planning, Ensa-hutment, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(4) Assistant Commissioner, N Ward Office, 101-3, Jawahar Rd, Saibaba Nagar, Pant Nagar, Ghatkopar East, Mumbai, Maharashtra 400 077.

3. This notice is also available on the Slum Rehabilitation Authority website at *www.sra.gov.in.*

Bandra (E.), Mumbai,
Dated 1st August 2025.

DR. MAHENDRA KALYANKAR,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority Brihanmumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.